प्रकरण पहिले

आत्मपरीक्षा : स्वरूप आणि प्रयोजन

::*:: प्र क र ण प हि ले ::*::

** आत्मचरित्र : स्वरूप आणि प्रयोजन **

प्रत्येक माणसाचे जीवन एकापरीने विलक्षण असते. प्रत्येकाच्या जीवनात सुख-दुःखे, जय-पराजय, आशा-निराशा यांचा सतत खेळ चाललेला असतो. जगण्याच्या आणि सुख-दुःखात्मक अनुभव घेण्याच्या प्रक्रियेत मनुष्य इतका गढून गेलेला असतो की, आपल्या अनुभवांचे तटस्थपणाने चिंतन करायला त्याला वेळ मिळत नाही किंवा आपण आपल्या अनुभवांचे शोधक दृष्टीने मंथन करावे अशी प्रेरणाही त्याला होत नाही. पण प्रत्येकाचे जीवन काही अंशी समान असूनही ब-याच अंशी दुस-याहून कितीतरी वेगळे असते. असंख्य प्रकारचे अनुभव माणसाच्या वाट्याला येतात. काळाबरोबर ते वाहून जातात. पण एखाद्या माणसाला आपल्या आयुष्याच्या कहाणीत अधिक रस वाटतो. आपण कसे जगलो, आपण आयुष्यातील आपत्तींना कसे सामोरे गेलो, नाना प्रकारचे संघर्ष आपल्याला अपरिहार्यपणे कसे करावे लागले, कित्येक संघर्षात आपली बाजू न्यायाची असूनही आपल्याला कसे पराभूत व्हावे लागले, काही वेळा अनपेक्षितपणे विजयाचे श्रेय आपल्या पदरात कसे पडले इत्यादी गोष्टी कुणाला तरी मनापासून सांगाव्यात आणि त्या सांगताना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळवावा असे वाटत असते, मग तो आत्मकथन करतो. महाकवी कालिदासाने म्हटले आहे, "स्निग्धजन संविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति" जवळच्या मित्रांना आपली दुःखे सांगितली, वेदना कथन केल्या म्हणजे त्या अधिक सुसह्य होतात. दुःख सांगण्यात देखील आनंदाचा भाग आहे. कारण त्यातून आत्माविष्कार होतो. हा आत्माविष्काराचा

आनंद साहित्याच्या इतर प्रकारातून जसा मिळतो त्यापेक्षा तो आत्मकथनातून, आत्मचरित्रातून विशेष प्रमाणात मिळू शकतो असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. आत्मनिवेदनातून आनंद मिळत नसता तर कुणीही आत्मवृत्ते लिहिली नसती. आत्मचरित्र लेखन मनुष्याला एक आगळे समाधान देऊ शकतो.

आपले छायाचित्र ज्याप्रमाणे आपल्याला आनंद देते किंवा आरशातले आपले प्रतिबिंब एक प्रकारचे समाधान देते, आपल्याला ते पहात रहावेसे वाटते, त्याप्रमाणेच आत्मचरित्र लेखनातून मिळणा-या आनंदाचे आहे. "मी" हा असा आहे हे जणू आत्मचरित्रकार स्वत:ला आणि इतरानां समजावून सांगतो हे समजावून सांगण्याची त्याला जी अपरिहार्यता वाटते तिचे कारण त्याच्या आत्मप्रीतीत सामावले आहे. मनुष्य जगातल्या असंख्य गोष्टीवर,प्रेम करतो पण त्याचे प्रेम स्वत:वर सर्वाधिक असते. "आत्मनस्तुकामाय सर्वं प्रियं भवति" असे एक वचन आहे. आत्मप्रेम हेच माणसाच्या आत्मचरित्र लेखनाचे रहस्य म्हणावे लागेल.

आत्मचरित्र हा लेखकाच्या आयुष्याचा दस्तऐवज असतो मात्र तो सत्याधिष्ठित असला पाहिजे. जेव्हा आत्मकथनात कल्पिताची, अद्भुतांची भेसळ होते तेव्हा ते आत्मचरित्र रहातच नाही. ती एखादी काल्पनिक व कृत्रिम अशी कथा होते. अशी अवस्था कित्येक आत्म-चरित्रांची झाली असेल. मुद्दाम उदाहरणं दिलीच पाहिजेत असे नाही सत्य दडवण्याची आणि स्वत:ची महती गाण्याची प्रवृत्ती पुष्कळ लोकांत असते. काही आत्मचरित्रांत या प्रवृत्तीचा स्वैर संचार झालेला दिसू शकतो. ख-या अर्थाने ती आत्मकथनेच नव्हेत. चांगल्या आत्मचरित्रात आत्मनिवेदन असतेच पण त्यापेक्षाही आत्मसंशोधनाची प्रामाणिक ऊर्मी त्यात दिसते, पुन्हा त्यात जीवनाचे चिंतनही असते, आपण अनुभवलेल्या

सुखादु:खाचे विश्लेषण असते. चांगले आत्मचरित्र लेखकाच्या व्यक्तित्वाची त्याच्या गुणदोषांची वास्तव प्रतिमा वाचकांच्या दृष्टीसमोर उभी करू शकते./ अशी आत्मचरित्रे संख्येने अल्प असतात. अलीकडे तर आपले आत्मचरित्र दुस-यांकडून लिहून घेण्याची एक चमत्कारिक प्रथा सुरू झालेली दिसते हे अत्यंत हास्यास्पद वाटते. आत्मचरित्रांची कादंबरी व्हायला मग वेळ लागत नाही.

आत्मचरित्राचे स्वरूप :

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे. चरित्र हे दुस-या व्यक्तीने लिहिलेले असते तर आत्मचरित्र मात्र स्वत:च लिहिलेले स्वत:चेच चरित्र असते. आत्मचरित्रकार हा आपल्या आत्मचरित्रात स्वत:च्या जीवनाचे दर्शन स्वत:च घडवीत असतो प्रत्येकाचे आत्मचरित्र हा त्याच्या स्वजीवनाचा इतिहासच असतो. श्री.रा.ग. जाधव यांनी "आपल्या जीवनविषयक अनुभवांचे तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वत: लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय"[१] अशी आत्मचरित्राची व्याख्या केली आहे.

आत्मचरित्र हा एक वैशिष्टयपूर्ण व उपयुक्त वाङ्मयप्रकार असल्याने आत्मचरित्र लेखनाद्वारे आपणास अनेक लहान-मोठया व्यक्तींची ओळख होऊ शकते शिवाय आत्मचरित्रकाराची मानसिक घडण, त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, त्याच्यावर घडलेले विविध संस्कार, त्यांचे आचार-विचार, संस्कृती इत्यादी ब-याच गोष्टी आपणास समजतात. खरे तर प्रत्येक क्षेत्रातल्या नामवंत व्यक्तींनी आपापले आत्मचरित्र जरूर लिहून ठेवावे. म्हणजे त्या त्या क्षेत्रांतील ज्ञान व त्यांना आलेले अनुभव इत्यादींची पूर्ण माहिती आपल्याला मिळू शकेल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

स्वत:ला स्वत:ची माहिती अधिक असते यात कुणाचे दुमत नाही. आपल्या जीवनातील गतस्मृतीत आपण जितके रमतो तितके दुसऱ्याच्या जीवनाशी आपण समरस होऊ शकत नाही. श्री. म. माटे तर म्हणतात,

"कुणीतरी त्रयस्थ माणसाने लिहिलेल्या चरित्रापेक्षा त्या त्या व्यक्तीने लिहिलेले आपले चरित्र हे केंव्हाही अधिक विश्वसनीय असते. शिवाय इतरांना न दिसलेले चरित्र नायकाच्या स्वभावाचे कंगोरे त्याच्या आत्मचरित्रात सापडतात. या दृष्टीने चरित्रापेक्षा आत्मचरित्रे ही अधिक मनोरंजक असून ती आपणाला मनोरंजनाबरोबरच ज्ञानही देतात, यात संशय नाही"[२] त्यांचे हे मत बरोबर वाटते.

डॉ. जी. नाईक यांनीही आत्मचरित्र लेखनाबद्दल असेच विचार मांडलेले आहेत. ते म्हणतात,

"Autobiography is primarily subjective. It is built from written outward. The invisible world within the individual is revealed to the readers and that too by no less an authority than the individual himself. It is therefore firsthand and direct information and no guess - work".[3]

चरित्रापेक्षा आत्मचरित्रातून मानवी जीवनाचे [स्वभावाचे] दर्शन अधिक प्रभावीपणे घडू शकते हेच त्यांना सुचवायचे आहे व ते योग्यही आहे.

आत्मचरित्रात व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या मृत्यूपर्यंतची संपूर्ण हकीकत येऊ शकत नाही. म्हणून डब्ल्यू.एच.डन. या ग्रंथकाराने आत्मचरित्राचे "मस्तक अवयवविरहित मूर्ती"[४] (The true autobiography is but a torso) असे वर्णन केले आहे. हा एक आत्मचरित्राचा

दोष मानला जातो. कारण कुठल्याही व्यक्तीला आपल्या जीवनातील सगळ्याच घटना तंतोतंत आठवत नाहीत. विशेषत: बालवयातील काही घटनांचे विस्मरण होऊ शकते. तेव्हा अशा वेळी ऐकीव घटनेवर विश्वास ठेवून लेखन करावे लागते. परंतु असे एकांगी चित्रण करू नये. ज्या घटना पूर्णपणे आठवतात त्याच लिहाव्यात, आत्मचरित्रात व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या मृत्यूपर्यंतच्या सगळ्याच घटना आल्या पाहिजेत असा काही नियम नाही. आत्मचरित्राकाराने आत्मचरित्रात आपल्या जीवनातील काही ठळक गोष्टीच सांगितलेल्या असतील तर त्यावरूनही आपणास त्या लेखकाच्या व्यक्तित्वाचे आकलन समाधानकारक होऊ शकते तेव्हा हा दोष मानण्याचे कारण नाही.

आत्मचरित्राकार आपल्या जीवनात आलेल्या विविध अनुभवांचा आपापल्या परीने शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. आत्मचरित्र लिहिण्या-यांसाठी ते आवश्यकही आहे. भूतकाळातील प्रमुख घटनांचे सलग निवेदन त्यास करावयाचे असल्याने असा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. परंतु आत्मचरित्रात केवळ घटनांचेच निवेदन करावयाचे नसते तर सभोवतालच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपले व्यक्तिचित्र कसे उठून दिसेल याचेही चित्रण करणे त्यास अभिप्रेत असते. केवळ त्यांनी आपल्या आत्मचरित्रात क्रमवार घटनाच सांगण्याचा प्रयत्न केला असेल तर असे आत्मचरित्र नक्कीच रूक्ष व निरस होईल. म्हणून आपल्या जीवनात स्वत:ला आलेल्या अनुभवांकडे तटस्थपणाने पहातच आपली कहाणी सांगितली पाहिजे. तेंव्हाच ते आत्मचरित्र होईल. या संदर्भात "एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका" मध्ये दिलेली आत्मचरित्राची व्याख्या अधिक योग्य वाटते.

"The account of an individual human life, written by subject himself" [५]

चरित्र लिहिण्यापेक्षा आत्मचरित्र लिहिणे कधी कधी सोपे वाटते कारण ते लिहिण्यास विशेष कल्पनाशक्ती, कुशाग्रबुध्दी, प्रदीर्घ व्यासंग वगैरे लागत नाही. हे खरे असले तरीही आत्मचरित्र लिहिणे अवघड आहे. कारण यात स्वतःच्या अनुभवाचे निवेदन सत्यास धरुन करावयाचे असते. आपले दोष प्रांजलपणे दाखवायचे असतात ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. आपल्या हातून सत्य लिहिलेच जाते असे नाही. आपल्या काही चुका या चुका आहेत हे कित्येकवेळा आपल्याला मान्यच करवत नाहीत. कारण आपल्याला ज्या गोष्टी योग्य वाटतात त्या इतरांना वाटतीलच असे नाही. आपल्या काही खाजगी गोष्टी इतरांना समजू नयेत असेही वाटून काही घटना लिहिण्याचे लेखक मुद्दाम टाळतो किंवा सत्य सांगण्याने आपली समाजात असलेली प्रतिष्ठा कमी होईल असेही त्यास वाटण्याचा संभव असतो. याशिवाय कांही लोक आत्मप्रौढीचा दोष आपल्यावर येईल म्हणून स्वतःच्या जीवनातील काही यशस्वी जीवनप्रसंग, गौरवास्पद घटनांदेखील लिहिण्याचे टाळतात. हाही आत्मचरित्रलेखनातील एक दोषच समजला पाहिजे. आणखी एक गोष्ट विशेषत्वाने सांगायची म्हणजे, प्रत्येकाच्या जीवनात अशा काही घटना घडलेल्या असतात की त्याच्या स्मरणाने देखील अधिक दुःख होण्याचा संभव असतो. मग अशा गोष्टी वगळूनच तो आत्मचरित्र लिहिणार यात काही वाद नाही. आत्मचरित्रांत इतरांचे दोषही स्पष्टपणे दाखवता येत नाहीत. म्हणून पुष्कळांच्या हातून विश्वसनीय आत्मचरित्र लिहिले जात नाही. किंवा लिहिणे कठीण होऊन बसते. या संदर्भात डॉ. गं. बा. ग्रामोपाध्ये म्हणतात,

"सत्य संपूर्ण सत्य सांगावे, अशी आपली अपेक्षा असली तरी ते फार कठीण आहे. नावनिशीवार उल्लेख, बदनामी, भावना दुखविणे इ. मुळे अशक्य."[६]

स्वत:चे असे कठोर आत्मपरीक्षण करून आत्मचरित्र लिहिणे फारच थोड्या लेखकांना साधते. आपल्या जीवनातील घटनांकडे निरपेक्ष वृत्तीने पाहून आत्मनिवेदन करणे हे खरोखरच अवघड काम आहे. अ.ना.देशपांडे आत्मचरित्र लेखनाविषयी म्हणतात, "आत्मचरित्र निवेदन म्हणजे तारेवरची कसरत. आत्मश्लाघ्यतेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाही याबद्दल पदोपदी दक्षता बाळगायची आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या स्वभावविशेषांचे किंवा गुणदोषांचे आणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची असे दुहेरी धोरण आत्मचरित्राकाराला सांभाळावे लागते."[७]

काहीही असले तरी आत्मचरित्राकाराने समाजाची भीती न बाळगता अत्यंत मोकळेपणाने, प्रामाणिकपणाने आपले आत्मचरित्र लिहावे परंतु सहसा असे होत नाही ही खेदाची बाब आहे. ब-याचदा काल्पनिक गोष्टींचा आधार घेऊन स्वत:चे आत्मचरित्र अधिक मनोरंजक करण्याचा प्रयत्न काही लेखकांनी केलेला दिसून येतो. अशा दृष्टिकोनातून लिहिलेली आत्मचरित्रे मग कादंबरीसदृश होतात. असे कादंबरीसदृश आत्मचरित्र विश्वासार्ह असेलच असे नाही.

गोदावरी परुळेकर आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, "जेव्हा माणूस जागा होतो" हे पुस्तक जे पाहिले जे अनुभवले तेच शब्दांकित करायचे, या उद्देशाने लिहिल्यामुळे वस्तुस्थितीपेक्षा वेगळे काही लिहिण्याचा मोह मला कधीच झाला नाही."[८] अर्थात यावर विश्वास ठेवणे न ठेवणे हे प्रत्येकाच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे.

वस्तुत: आत्मचरित्राकाराने आपल्या जीवनात घडलेल्या घटनांशी प्रामाणिक राहूनच आत्मनिवेदन करावे. कारण आत्म-चरित्रात आत्मनिष्ठा ही अत्यंत महत्त्वाची असते. या संदर्भात बा.सी.मर्ढेकर म्हणतात, "आत्मनिष्ठा हा वाङ्‌मय निर्मितीचा आद्यबिंदू तर आहेच आहे, पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे आत्मनिष्ठेतच वाङ्‌मय निर्मितीची परिणती आहे. वाङ्‌मय निर्मितीची सुरुवात ज्याप्रमाणे आत्मनिष्ठेपासून व्हावयास पाहिजे तसा तिचा शेवटही आत्मनिष्ठेतच व्हावयास पाहिजे"[९] थोडक्यात काय तर आपल्या अनुभवाशी एकनिष्ठ राहूनच चित्रण केले पाहिजे.

आत्मचरित्र हा वाङ्‌मय प्रकार व इतिहास यांचे अगदी जवळचे नाते आहे. असे मानले जाते किंवा इतिहासातील सत्याप्रमाणे त्याचे स्वरूप असते. परंतु हे मत तितकेसे पटत नाही. मूलत: दोघांची प्रकृती भिन्न आहे. इतिहासकार हा प्रत्यक्ष घटनांपासून कधी कधी अलिप्त असू शकतो, तसे आत्मचरित्राकाराचे नसते. तेव्हा आत्मचरित्र हा एक संमिश्र स्वरूपाचा ललित वाङ्‌मयास जवळ असलेला वाङ्‌मय प्रकार आहे. ह्यास्तव त्यातून विशुध्द स्वरूपाचा कलानंद मिळण्याची शक्यता कमी, इतर वाङ्‌मयात कमी प्रमाणात आढळणारी समरसता मात्र आत्मचरित्रात जास्त प्रमाणात आढळते.

आत्मचरित्र लिहिताना आत्मस्तुती,आत्मप्रदर्शन,आत्मगौरव, आत्मप्रौढी,आत्मपूजा ह्या सगळ्याच गोष्टी टाळाव्या. कारण ह्या गोष्टी कलात्मकतेला बाधक ठरू शकतात. आत्मचरित्रांतली कलात्मकता ही वस्तुनिष्ठता आणि आत्मनिष्ठता यांच्यातील तोल व संयम राखण्यावरच अवलंबून असते. जर आत्मचरित्राकाराची निवेदन शैली चांगली असेल, त्याच्याजवळ सौंदर्यदृष्टी व रसिकवृत्ती असेल तर त्याचे आत्मचरित्र निश्चितच उत्कृष्ठ व कलात्मक उतरेल.

UNIVERSITY ... APUR

आत्मचरित्र - लेखनामागील लेखकांच्या प्रेरणा :

प्रत्येकाचा आत्मचरित्र लिहिण्याचा हेतू वेगवेगळा असतो. त्यामागे "स्वान्तः सुखाय" प्रवृत्ती असू शकते किंवा "परहिताय प्रवृत्ती" ही असू शकते. आत्मचरित्रामागील सगळ्यात महत्वाची प्रेरणा आत्माविष्काराची होय. परंतु लिखाणात याचाही अतिरेक झाल्यास त्यास आत्मप्रदर्शनाचा रंग येण्याचा संभव असतो. स्वतःचे अनुभव दुसऱ्यास सांगणे हे काही गैर नाही. उलट आपल्या व्यथा जवळच्या मित्र-मैत्रिणींना सांगितल्यास आपले मन दुःख-मुक्त होते. मात्र प्रत्येकांच्या आत्मकथनामागे निरनिराळा उद्देश असतो. कुणी आपले दुःख हलके करण्यासाठी लिहितो, कुणी बोधाच्या दृष्टिकोनातून लिहितो, कुणी जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी लिहितो, तर कुणी वाचकाला सनसनाटी मजकूर देऊन रंजविण्यासाठी लिहितो, कुणी आपल्या कार्याचा आदर्श दुसऱ्यांपुढे ठेवण्यासाठी लिहितो, कुणी आपल्या कार्याचा आत्मचरित्राद्वारे प्रचार व्हावा या हेतूने लिहितो, कुणी आपल्या विषयीचा पसरलेला गैरसमज दूर करण्यासाठी लिहितो, तर कुणी कबुली-जबाबसारखो लेखन करून पापमुक्त होण्याच्या हेतूने लिहितो. अशा अनेक हेतूंनी आत्मचरित्रे लिहिली जातात.

आपल्या जीवनातील सुखदुःखे इतरांना सांगितल्यास मन हलके होते. या विचारांतून बरीचशी आत्मचरित्रे लिहिली जातात. परंतु सहसा आत्मचरित्र हे स्वयंस्फूर्तीतूनच लिहिले जावे म्हणजे ते अधिक सरस होईल. ज्याला आपले विचार सांगण्याची तळमळ लागून राहिलेली असेल त्यानेच आत्मचरित्र लिहावे असे म्हणतात, पण काहींना प्रबळ इच्छा होऊनही ते आत्मचरित्र लिहू शकत नाहीत.

त्याचे काय ? अर्थात आत्मचरित्र लिहिण्यामागे ब-याच अडचणी आहेत म्हणा. याचा उल्लेख मागे आलेलाच आहे.

आपल्या जीवनापासून दुस-यांनी बोध घ्यावा अशा बोधात्मक हेतूनीही आत्मचरित्रे लिहिली आहेत. ल.रा. पांगारकर यांचे आत्मचरित्र यात मोडते. आपल्या "चरित्रचंद्र" या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत ते म्हणतात,

"माझ्या चरित्रात कोणासही काही घेण्यासारखे नाही, असे मला वा-टले असते तर हा चरित्र लिहून प्रसिध्द करण्याचा हा उदयोग मी केला नसता".[१०] असाच दृष्टिकोण बाबा पद्मनजींच्या "अरूणोदय" या आत्मचरित्रातून दिसून येतो. याशिवाय हाच हेतू ठेवून महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी आपले "आत्मवृत्त" लिहिले आहे. ते म्हणतात, "आमची चरित्रे सामान्य विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडतील असे मला वाटते."[११]

बोधाच्या हेतूने लिहिलेल्या आत्मचरित्रात कधी कधी स्वत:चे दोष लपविण्याचा मोह आत्मचरित्राकाराला होण्याची शक्यता असते. स्वत:चे अनुभव दुस-याला जरूर सांगावे परंतु त्यातून इतरांना बोध व्हावा असा आग्रह धरू नये. ते फारसे योग्य वाटत नाही.

जुन्या आठवणींची उजळणी करण्याकरिता कहीजण आत्मचरित्र लिहिताना आढळतात. पूर्वायुष्यातील कडू-गोड आठवणींना उजाळा देण्याचा छंद अनेकांना असतो. शिवाय नंतर जुन्या दुख:प्रद आठवणींची धारही बरीच बोथट झालेली असते. त्यामुळे जुन्या आठवणीत रमण्याने एक प्रकारचा सुखद अनुभव आपल्याला मिळत असतो. नाहीतरी माणसाचे मन पुढे पाहण्याऐवजी मागेच पाहण्यात जास्त रमते. थोडक्यात गतस्मृतीत रमायला प्रत्येकांना आवडते.

अशा त-हेचे गत स्मृतींना उजाळा देण्याच्या हेतूने लिहिलेले आत्मचरित्र म्हणजे नटवर्य बोडस यांचे "माझी भूमिका" ही होय. यात ते म्हणतात -

"थोडा काळ का होईना, पण गतगोष्टीत स्मृतिरूपाने रहायला मिळावे म्हणून मी आत्मचरित्र लिहिले."[१२] मालतीबाई बेडेकरांचाही हाच हेतू दिसून येतो. त्या आपल्या आत्मचरित्रा-विषयी म्हणतात -

"या अत्यंत दु:खाच्या व उद्विग्नतेच्या काळात मनाला केवळ विरंगुळा म्हणून मी या माझ्या आयुष्याच्या आठवणी लिहायला घेतल्या मी लेखन करीत असले की रोजच्या जीवनातल्या सुख-दु:खाचा मला काही काळ तरी विसर पडतो, हा आजवरचा अनुभव याही वेळा प्रत्ययाला आला."[१३]

"स्मृतिचित्रे", "गतगोष्टी" ह्यातही जुन्या आठवणींचा इतिहासच आलेला आहे. प्रसिध्द इतिहासतज्ञ गिबन तर म्हणतो, "वयाच्या बावन्नाव्या वर्षी माझे इतिहास लेखनाचे कार्य संपूर्ण झाल्यामुळे आता रिकाम्या वेळात गतायुष्यावर एकदा दृष्टी टाकण्याची मला इच्छा होत आहे. तसे करण्यात स्वत:च्या मनाचे समाधान हा एकच हेतू आहे व तेच माझे फल होय."[१४]

काही लेखक कबुलीजबाबासारखे आत्मचरित्र लिहिताना दिसतात. आपल्या चुका समाजापुढे कबुल केल्याने मनाला एक प्रकारचा मोकळेपणा येतो. मानसिक समाधान मिळते असे त्यांना वाटत असते. या कारणाने तो आत्मचरित्र लिहिण्यास प्रवृत्त होतो. न.चिं. केळकर याविषयी म्हणतात,-

"आपल्या आठवणी दुःखद असल्या तरी त्या प्रामाणिकपणाने तळमळीने लोकांसमोर मांडल्याने आपल्या अपराधयांचा कबुली जबाब देऊन मोकळे होण्याचे समाधान मनुष्याला मिळू शकते."[१५]

प्रसिध्द लेखक रूसोचेही लेखन असेच आहे. त्यांनी आपल्या आत्मचरित्राला "कबुलीजबाब"Confession असेच नाव दिले आहे. या ग्रंथाच्या सुरूवातीसच रूसो म्हणतो,

जेव्हा मला देवाघरचे बोलावणे येईल तेंव्हा मी हे माझे आत्मचरित्र ईश्वरासमोर ठेवीन आणि म्हणेन की, "देवा, मी अशा त-हेने जगात वागलो आहे, माझी पुण्यकृत्ये व पापे मी प्रामाणिकपणे तुझ्यासमोर ठेवीत आहे"[१६] पापाला उघड केल्याने पापाचा क्षय होतो. अशी ख्रिस्ती लोकांची समजूत असते. आपल्या धर्मगुरूसमोर दिलेल्या कबुलीजबाबासारखे याचे स्वरूप असते.

काही राजकीय नेत्यांनी, समाजसुधारकांनी व देशभक्तांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांत त्यांच्या कार्याचा प्रचार व आत्मसमर्थन आढळते. वास्तविक पाहता असे चित्रण येणे स्वाभाविक असते, पण तोच हेतू समोर ठेवून लेखन करू नये. काहींना नाहीतरी स्वतःचा मोठेपणा सांगण्याची सवय असते. परंतु आपल्या कार्याबद्दल, योग्यतेबद्दल आपण स्वतःच काही मत मांडू नये. आपल्या कार्याबद्दल योग्यतेबद्दल इतरांनी निकाल दिल्यास ते अधिक चांगले मानले जाते. आपल्या कार्याचा तपशील जसा आहे तसा मांडल्यास आत्मसमर्थनाला नक्कीच गौणत्व प्राप्त होईल. प्रा. गंगाधर गाडगीळ म्हणतात,

"आपल्या सा-या स्मृतिरूप अनुभवांना सजीव करून त्यांची स्पंदणारी प्रतीती घेणे, त्याचा आकार जाणिवेत उमटविणे, त्यांच्याकडे एका वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थपणे पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे, अशा प्रकारे त्यांना अजर आणि अमर करणे हे कार्यही आत्मचरित्राद्वारे साधता येते."[१७]

महर्षि कर्व्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी केलेला स्त्री शिक्षणाचा प्रचार आढळतो. विनायक दामोदर सावरकरांच्या "माझी जन्मठेपे"त तत्वज्ञानाचा व त्यांच्या कार्याचा अंतर्भाव झालेला दिसून येतो. प्रसिध्द राजकीय नेता अॅडॉल्फ हिटलर यांच्या "माझा झगडा" [Mein Kampf] या आत्मचरित्रात त्यांच्या पक्षाचा व तत्वाचा प्रचार आढळतो. याशिवाय स्वत:विषयी पसरलेला गैरसमज दूर करण्याचाही प्रयत्न यात केलेला दिसून येतो. काहीही असो आपला हेतू समजण्यासाठी काही लेखक असे लेखन करतात. हे खरे असले तरी खास हाच हेतू बाळगून आत्मचरित्र लिहू नये. कारण असे चित्रण आपल्या जीवनातील काही प्रसंग सांगताना आपोआप येतेच.

काही आत्मचरित्रकारांनी समाजदर्शन घडविण्याच्या हेतूने आपले आत्मचरित्र लिहिले आहे. उदा. आचार्य अत्रे यांचे "क-हेचे पाणी" यात महाराष्ट्राचा पन्नास वर्षांचा राजकीय व सामाजिक इतिहास आला आहे. ह्याच हेतूने लिहिलेले आणखी एक आत्मचरित्र म्हणजे सी.ग.देवधरांचे "जीवन वृत्तांत" होय. याच संदर्भात पार्वतीबाई आठवल्यांची "माझी कहाणी" उल्लेखनीय आहे. याच धाटणीचे पण थोडेसे वेगळे आत्मचरित्र म्हणजे श्री.म.माट्यांचे "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" होय. वि.द.घाटे यांच्या

("दिवस असे होते") यातही असेच समाजदर्शन आढळते. परंतु आत्मचरित्रात जीवनदर्शनापेक्षा, समाजदर्शनापेक्षा व्यक्तिदर्शनाला अधिक महत्व असते. यासंबंधी ग्रंथकार अ.म.जोशी म्हणतात, "ग्रंथकाराचे चरित्र म्हटले तरी त्याचा प्रमुख हेतू, व्यक्तिचित्रण हाच असावयास पाहिजे."[१८]

मनात जाचत असलेल्या गोष्टी लोकांसमोर मांडल्यास मनुष्याला थोडे समाधान मिळण्याची शक्यता असते. हा हेतू बाळगूनही आत्मचरित्राकार आत्मचरित्र लिहिण्यास प्रवृत्त होतो. परंतु कधी कधी ह्या जाचणाऱ्या गोष्टी देखील समाजाच्या भीतीमुळे किंवा अन्य इतर कारणामुळे आपण लिहू शकत नाही. काही घटना मुळातच न लिहिण्यांसारख्या असतात किंवा त्या घटना आपल्यालाअसंतुष्टपणाच्या अप्रसन्नतेच्या वाटतात. शिवाय आपल्या जीवनातील रहस्ये निर्भिडपणे समाजापुढे मांडणे हे कामही सोपे नसते. आपले वैयक्तिक जीवन इतरांपासून सहसा आपण लपवूनच ठेवतो. अगदी आपल्या जवळच्या व्यक्तीला देखील आपली संपूर्ण माहिती नसते. समाजाच्या भीतीने किंवा आपल्यावर झालेल्या विशिष्ट संस्कारामुळे आपण काही गोष्टी इतरांना सांगू शकत नाही. विशेषत: लैंगिक अनुभवांच्या बाबतीत. ह्या गोष्टी नैसर्गिक असल्या तरीही आपल्या संस्कृतीच्या दबावामुळे त्या घटना लिहू शकत नाही. अशा गोष्टी निवेदन केल्यास आपले व्यक्तिमत्व डागाळेल असे बऱ्याचजणांना वाटत असते. शेवटी आपल्या जीवनातल्या सर्वच गोष्टी सांगायच्या म्हणजे त्या व्यक्तीजवळ आत्मधैर्य-ही असायला हवे हेही तितकेच खरे. परंतु अलिकडे असेही लेखन काही जण बिनधास्त करताना आढळतात. उदा. एथेल मॅनिन यांच्या " Confessions and Impressions " या आत्मचरित्रात लैंगिक अनुभवाबद्दल बरेच बिनधास्त चित्रण आलेले आहे. श्रीमती.हंसा

वाडकर यांचेही "सांगते ऐका" हे आत्मचरित्र अत्यंत प्रांजळपणाने लिहिलेले आहे. त्यांनी आयुष्यात जे जे प्रसंग अनुभवले ते अगदी स्पष्टपणे, निर्भिडपणे सांगितलेले आहे. काही आत्मचरित्रे वगळता अशी वासना-रहित तटस्थवृत्ती बाळगून आत्मचरित्र लिहिले जात नाही. ही खेदाची बाब आहे. हा आत्मचरित्र लेखनाचा दोष समजला जातो व हे नाईलाजास्तव आपल्याला मानावेच लागेल. परंतु, आत्मचरित्रात कलात्मकता असली म्हणजे असल्या दोषाचे विस्मरण होऊ शकते. या संदर्भात न.चिं.केळकर यांच्या "गतगोष्टी" या आत्मचरित्राबद्दल अ.म.जोशी यांनी व्यक्त केलेला अभिप्राय महत्वाचा आहे ते म्हणतात,

"ज्या ठिकाणी ते राजकारणाच्या प्रांतात शिरले आहेत, त्या ठिकाणी त्यांची स्वत्वाची जाणीव उसळी मारून वर आल्या-सारखी वाटते व शुध्द भावनेची जागा वासनेने घेतल्यासारखी वाटते. हा दोष जरी असला तरी भाषेचे व वर्णनाचे लालित्य, कथनातील खेळकरपणा व आत्मपरीक्षणांतील मार्मिकता इ. गुणांमुळे केळकरांचे आत्मचरित्र कोणत्याही आत्मचरित्र वाङ्मयात महत्वाचे स्थान मिळविल यात शंका नाही."[१९]

अगदी विश्वसनीय आत्मचरित्र कुणाच्याही हातून लिहिले जावू शकत नाही. महात्मा गांधीसारखे एखादे अपवादात्मक असू शकतील. आत्मचरित्र कितीही प्रामाणिक वृत्तीने लिहिलेले असले तरी त्यावर कोणत्या ना कोणत्या कारणाने लोक आरोप करतातच. इतरांच्या चांगुलपणावर लोकांचा लवकर विश्वासच बसत नाही. म.गांधी व महर्षी कर्वे यांच्या लिखाणावर देखील प्रामाणिकपणाचा सोंग केल्याचा आरोप करण्यात आला. तेव्हा इतरांविषयी तर सांगावयास नकोच. यावरून आत्मचरित्राकाराची स्थिती कशी कात्रीत पकडल्यासारखी होते हे दिसून येते. एकंदरीत त्याची स्थिती अत्यंत नाजूक असते. संबंधित व्यक्तीबद्दलही त्याला मोकळेपणाने लिहिण्याचे

स्वातंत्र्य नसते. कोणत्या गोष्टी लिहाव्या, कोणत्या टाळाव्या याचे तारतम्य त्याला बाळगावे लागते. एथेल मॅनिन स्पष्ट म्हणते की, "आपण स्वत: नग्न व्हावयास तयार असलो तरी इतरांनीही तयार असावे अशी अपेक्षा आपण का करावी ?"[२०] थोडक्यात आत्मचरित्रा-कार अनेक बंधनांनी जखडलेला असतो, पण आत्मचरित्राकाराला आपल्या आठवणी व अनुभव प्रसंगानुसार जिवंत करता आल्या तर ते आत्मचरित्र उत्तम आत्मचरित्र म्हणून कसोटीला उतरेल यात शंका नाही. याचे एक उदाहरण दयायचे झाल्यास म.गांधी यांच्या "सत्याचे प्रयोग" या आत्मचरित्राचा उल्लेख करावा लागेल. म.गांधी आपल्या "सत्याचे प्रयोग" विषयी लिहितात, "माझे प्रयोग कोणत्याही प्रकारे संपूर्ण आहेत, असे माझे मुळीच म्हणणे नाही. एखादा शास्त्रज्ञ ज्याप्रमाणे आपले प्रयोग अतिशय पध्दतशीर रीतीने विचारपूर्वक व सूक्ष्मपणे करीत असूनही, त्यापासून काढलेली अनुमाने अखेरची आहेत असे लोकांना सांगत नाही किंवा त्या प्रयोगाचे हेच निर्विवादपणे परिणाम आहेत किंवा नाहीत याबद्दल साशंक असला तरी तटस्थ राहतो, अशाच त-हेचे माझेही माझ्या प्रयोगासंबंधाने म्हणणे आहे.

मी जी प्रकरणे लिहिणार आहे त्यांत जर वाचकाला अभिमानाचा त्रास झाला तर त्याने खुशाल समजावे, कि माझ्या शोधात काही तरी न्यून आहे आणि माझा साक्षात्कार मृगजलवत आहे. माझ्यासारख्या अनेकांचा क्षय झाला तरी फिकीर नाही, परंतु सत्याचा जय होवो.

माझे लेख कोणी प्रमाणभूत मानू नयेत अशी माझी इच्छा आहे - अशी माझी विनंती आहे. त्यांत दर्शविलेल्या प्रयोगांना दृष्टांतरूप समजून सर्वांनी आपापले प्रयोग यथाशक्ती आणि यथामती

करावेत एवढीच माझी इच्छा आहे. या मर्यादित क्षेत्रामध्येही लोकांना माझ्या आत्मकथेच्या लेखांचा पुष्कळ उपयोग होईल असा मला विश्वास वाटतो. कारण सांगण्यालायक एखादी गोष्ट मी लपविणार नाही. माझ्या दोषांची जाणीव वाचकांस परिपूर्ण करून देण्याची मला उमेद आहे. मला फक्त सत्याचे शास्त्रीय प्रयोग वर्णावयाचे आहेत. मी कसा देखणा आहे हे सांगत बसण्याची तिळमात्र इच्छा नाही."[२१]

आत्मचरित्रात स्वभावावर व व्यक्तिचित्रावर भार देणे आवश्यक असते. या संदर्भात वा.ल.कुलकर्णी यांचे मत महत्वाचे वाटतात, ते म्हणतात, "स्वत:पासून स्वत:ला दूर सारून जर स्वत:कडेच परंतु त्रयस्थाच्या नजरेने बघता आले तरच त्याला स्वत:चे यथार्थ दर्शन घडण्याचा संभव असतो. आपणाला आत्मचरित्रात त्या व्यक्तीचे चित्र नको असते, चरित्र हवे असते. आत्मचरित्र हे आत्मचरित्र आहे, चित्र नव्हे."[२२] स्वभावचित्रणाच्या आधारे जीवनकथेची व वाङ्मयीन कृतीची उद्दिष्टये आत्मचरित्राद्वारे स्पष्ट होण्यास मदत होतात.

मराठी आत्मचरित्रात्मक लेखनाचा संक्षिप्त आढावा :

श्री. म. माटे यांच्या "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" या आत्मचरित्रापूर्वी प्रकाशित झालेल्या व त्यानंतर साधारणपणे १९५७-५८ पर्यंतच्या कालखंडात प्रसिध्द झालेल्या आत्मचरित्राचा आढावा.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

• आपल्याकडील मराठी आत्मचरित्र लेखनाला जवळजवळ दीड शतकाची परंपरा आहे. परंतु तरीही इतर वाङ्मयाचे जसे विपुल प्रमाणात लेखन झालेले आढळते तसे आत्मचरित्र या वाङ्मयाबाबतीत दिसून येत नाही. म्हणजे मराठी आत्मचरित्राचे दालन विशेष समृध्द नाही. ही कला इंग्रजांच्या काळात वाढीस लागलेली असली तरी याच्याही अगोदर ही कला आपणाकडे अस्तित्वात होती. याच्या अस्तित्वाच्या खुणा प्राचीन मराठी संतवाङ्मयात आढळतात. सुरूवातीस या आत्मचरित्रात्मक कलेकडे दुर्लक्ष झालेले असले तरी आज याची स्थिती उत्तम आहे. प्रथमतः आत्मचरित्रात्मक लेखनाच्या दृष्टीने बघितले तर असे लेखन नामदेव, जनाबाई, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई यांच्या अभंगात आढळते. तुकारामाचे अभंग तर एक प्रकारचे त्यांचे आध्यात्मिक आत्मचरित्राच आहे. परंतु ह्या व्यक्तींनी जाणीवपूर्वक आत्मचरित्रात्मक लेखन केलेले नाही. इंग्रजी कालखंडापूर्वी निरंजन माधव, नाना फडणीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, बापू कान्हो खांडेकर यांची आत्मचरित्रे प्रसिध्द झाली. परंतु असे असताना देखील १८७१ मध्ये लिहिलेले दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्राला मराठीतील पहिले आत्मचरित्र समजले जाते. असो. असेच आत्मपर लेखन आणखी काही वाङ्मयप्रकारात आढळते. उदा. खाजगी पत्रव्यवहार, मुलाखती, दैनंदिनी, रोजनामे, [जर्नल्स] ख्रिस्ती धर्म कल्पनेनुसार तयार केलेली पापनिवेदने, स्मृतिचित्रे [रेमिनिसन्सेस] व संस्मरणिका [मेम्वार्स] इत्यादी-चा समावेश यात होतो.

जगातील पहिले आत्मचरित्रात्मक लेखन "मार्कस ऑरेलियस" [१२१-१८४] याच्या ग्रीक भाषेतील आध्यात्मिक चिंतनात आढळते.

पाश्चात्य विभागातील आत्मचरित्रापर लेखनाची सुरूवात प्रबोधन-काळापासून झाली. जागतिक आत्मचरित्रापर वाङ्मयात ज्यांना निर्विवादपणे मानाचे व उच्च स्थान आहे असे भारतीय पुरूषांचे आत्मचरित्र म्हणजे महात्मा गांधीचे "सत्याचे प्रयोग" [१९२७-१९२९] आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचे "आत्मकथन" [१९३६] होय.

पेशव्यांच्या काळात लिहिलेले नाना फडणीसांचे आत्मचरित्र, विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी लिहिलेला वेदोक्त धर्मप्रकाश, [१८५९] व सुप्रसिध्द क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके [१८७९] इत्यादीकांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात नोंदीवजा आत्मकथन आढळते.

पेशव्यांच्या काळातील नाना फडणीसांच्या आत्मचरित्रा-बद्दल भीमराव कुलकर्णीनी आपले काही मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, "आत्यंतिक धर्म भावना आणि प्रखर कामवासना यांच्या कोंडीत सापडलेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वाची कोंडी पेशव्यांच्या आपल्याबद्दलच्या लोभामुळे कशी फुटली आणि परिणामी आपण राजकारणाकडे कसे जुंपलो गेलो याबद्दलचे हे निर्भीड आत्मनिवेदन आहे आणि आत्मपरीक्षणही आहे."[२३]

मराठीतील पहिला आत्मचरित्रात्मक ग्रंथ आद्य मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनी लिहिला. त्यांनी दैनंदिनीच्या आधारे आपल्या बालपणापासून ते १८८२ पर्यंत म्हणजे स्वत :चा मृत्यू होईपर्यंत थोडी थोडी भर टाकली आहे. यात अव्वल इंग्रजी कालखंडातील समाजस्थितीचे दर्शन घडते. ह्या ग्रंथाबद्दल पांगारकर म्हणतात; -

"१८२० पासून १८७० पर्यंतच्या महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याचा वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास या आत्मचरित्रावरून दिसून येतो." [२४]

याच दरम्यान बाबा पद्मनजींनी "अरुणोदय" [१८८७] हे आत्मचरित्र लिहिले यात त्यांनी केलेल्या खिस्ती धर्मांतराचा इतिहास आला आहे. आत्मचरित्र लेखनासाठी त्यांनी पत्रे, दैनंदिनी, वृत्तपत्रातील उतारे इत्यादींचा वापर केला आहे. तत्कालीन समाज-जीवनाचेही चित्रण यात आढळते.

यानंतरच्या काळात फारशी आत्मचरित्रे लिहिलेली आढळत नाहीत. "अरुणोदया" नंतरचे उल्लेखनीय भाषांतरित आत्मचरित्र म्हणजे वि.दा. सावरकरांनी लिहिलेले प्रसिध्द इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी यांच्या आत्मचरित्राचा केलेला अनुवाद होय. तेव्हाच्या राजकीय चळवळीमुळे व इंग्रज सरकारच्या दडपशाही धोरणांमुळे कित्येकांना आपले अनुभव उघडपणे मांडता आले नाही. म्हणून ह्या काळात फारशी आत्मचरित्रे लिहिली गेली नाहीत. ह्या वरील कारणांमुळेच सावरकरांनी हा मार्ग अवलंबिला. या ग्रंथाद्वारे त्यांनी राजकीय जागृती घडवून आणली. व राष्ट्रभक्तीचा महान संदेशही दिला.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीसही फारशी आत्मचरित्रे लिहिली गेली नाहीत. स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी आपले "आत्मवृत्त" १९१५ साली लिहिले. त्यांच्या आत्मचरित्रात स्त्री-शिक्षणाच्या कार्याची माहिती आली आहे. यात कठोर आत्मपरीक्षणही आढळते. वास्तविक पाहता या काळात टिळक, गोखले, शि.म. परांजपे ही बडी बडी मंडळी कार्यरत होती.

परंतु यातील एकानीही आपले आत्मचरित्र लिहिले नाही. या व्यक्तींनी आत्मचरित्र लिहिले असते तर आत्मचरित्राचे दालन अधिक समृध्द झाले असते. सावरकरांनी मात्र अशा धुमसत्या काळातच "माझी जन्मठेप" [१९२७] हे आत्मचरित्र लिहिले. इंग्रज सरकारने ह्या पुस्तकावर बंदी घातली होती. हा ग्रंथ त्यांच्या अंदमानातील जन्मठेपेवर आहे. मनमोकळेपणा, तटस्थवृत्ती, काव्यमयता, ओजस्वी वाणी हे गुण यात आढळतात. शिवाय यात देशप्रीती, अंतर्मुखता तळमळ, कळकळ इत्यादी विविध भावनांचा मिलाफ झालेला आहे.

सामाजिक उद्बोधनाच्या हेतूने लिहिलेले सी.ग. देवधरांचे "जीवनवृत्तांत" १९२७ या आत्मचरित्रात प्रतिकूल परिस्थितीतील विद्यार्थीदशेचे चित्रण आले आहे. यानंतर ल.रा. पांगारकर यांचा "चरित्रचंद्र" १९३८ व नरसिंह चिंतामण केळकरकृत "गतगोष्टी" १९३९ ही या कालखंडातील महत्वाची आत्मचरित्रे होत. पांगारकरांनी बोधवादी दृष्टिकोनातून आपले आत्मचरित्र लिहिले आहे. हे मागे आलेलेच आहे. तर केळकरांनी आपल्या जीवनाचा वृत्तांत विरंगुळा वाटावा; जुन्या आठवणीत रममाण होऊन एक वेगळ्याच समाधानात डुंबत रहावे या हेतूने लिहिला आहे. आपल्या गुणदोषाचेही त्यांनी तटस्थपणाने दर्शन घडविले आहे.

सुप्रसिध्द विनोदी लेखक व नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी १९३५ साली आपले "आत्मवृत्त" लिहिले यात त्यांच्या नाटय-निर्मितीचे रहस्य, त्याची पार्श्वभूमी इत्यादींचे चित्रण आले आहे. गो.स. टेंबे यांचा "माझा संगीत व्यासंग" १९४८ यात त्यांच्या संगीत साधनेचा वृत्तांत आला आहे. याबरोबरच त्यांचा "माझा जीवनविहार" १९४८ ही जीवनकथा चटकदार आहे. ग.गो. बोडसांचे "माझी भूमिका" १९४० यात त्यांनी आपल्या कलाजीवनातील आठवणी सांगितल्या आहेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

यानंतर महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे "माझ्या आठवणी व अनुभव" (१९४०) या आत्मचरित्रात देशांतील समाज सुधारणांचा इतिहास व त्यांना आलेल्या अनुभवांचे चित्रण आले आहे. ग.त्र्यं. माडखोलकरांची "दोन तपे" १९४६ व "एका निर्वासिताची कहाणी १९४९ ह्या दोन्ही आत्मवृत्तांमधून त्यांच्या स्वभावाची गुणवैशिष्टये कळतात. गायनाचार्य गोविंदराव देसाई यांनी "गोविंदाची गुजगोष्ट" १९४४ हे आत्मचरित्र लिहिले आहे. यात ते म्हणतात; -

"जीवनाच्या मार्गावर आलेल्या कंटकांचा निर्देश केवळ इतिहासाच्या स्वरूपांत अवश्य तेवढाच मी केला आहे. कलहाची छापली पुन्हा काढावी किंवा कोणाचे मन दुखवावे असा माझा सुतराम हेतु नाही व तशा वृत्तीत आज माझे मन नाही."[२५] हे त्यांचे वृत्तांत स्वरूप लेखन आहे. काका कालेलकरांच्या "स्मरणयात्रेत १९४९ कौटुंबिक चित्रण व व्यक्ति-दर्शन आढळते.

प्रि. गंगाधर नीलकंठ गोखले यांची "माझे आयुष्याचा चित्रपट" १९५० ही एका स्वाभिमानी अधिकाऱ्याची आत्मकथा आहे. यानंतर १९४४ साली "माझे क्रीडाजीवन" हे आत्मचरित्र पी.विठ्ठल यांनी लिहिले. ही एका क्रिकेटवीराची आत्मकथा आहे. विजय मर्चंट या आत्मकथेबद्दल म्हणतात,-

"त्या काळी क्रिकेट म्हणजे मूर्तिमंत करमणूक होती, क्रिकेट म्हणजे रोमांचक प्रसंगाची मेजवानी होती, त्या जुन्या काळी विठ्ठल यांना पाहिलेल्या जुन्या क्रिकेट शौकिनांना त्यांच्या या पराक्रमाची कथा वाचतानां त्या रम्य काळांत पुन्हा एकदा वावरत असल्याचा भास होईल यांत शंका नाही."[२६]

य.गो. जोशी यांनी लिहिलेल्या "दुधाची घागर" १९५५ हा एक वैशिष्टयपूर्ण आत्मग्रंथ आहे. यात त्यांनी स्वजीवन-चित्राणापेक्षा स्वत:च्या आईचेच व्यक्तिचित्राण अधिक केले आहे. कथेच्या रूपाने आईच्या आठवणी सांगितल्या आहेत.

१९५७ साली चिंतामणराव कोल्हटकर यांनी "बहुरूपी" नावाचे आत्मचरित्रा लिहिले. हे एका कलावंताचे आत्मचरित्रा आहे यात त्यांचे इतर नाटककारांशी आलेल्या संबंधाचे वर्णन आहे. हा ग्रंथ त्यावेळी बराच लोकप्रिय झाला होता असे म्हणतात.

१९५७ सालीच आणखी एक आत्मचरित्रा प्रसिध्द झाले ते म्हणजे श्री.म. माटे यांचे "चित्रापट, मी व मला दिसलेले जग" होय. यात स्वजीवनचित्राणापेक्षा समाजाचेच चित्राण जास्त आढळते.

पुढील काळात काही महाविद्यालयीन प्राध्यापकांनी आत्मचरित्रो लिहिलेली आहेत. यात त्यांच्या जीवनानुभवाचेच चित्राण अधिक आलेले आहे. कृ.पा. कुलकर्णी यांची "कृष्णाकाठची माती" १९६१, म.दा. अळतेकरांचे "उलटलेली पाने", वा.गो. मायदेवांचे "वेचलेले क्षण" १९६२, के.ना. वाटव्यांची "माझी वाटचाल" ही सर्वच आत्मचरित्रो वाचनीय आहेत. प्रत्येकांनी सेवानिवृत्तीनंतर विरंगुळा म्हणून आठवणी-च्या स्वरूपात आपापले आत्मचरित्रा लिहिले आहे.

सुरूवातीच्या काळात लिहिलेल्या आत्मचरित्रांचा हेतू जवळजवळ बोधवादी होता. नंतरच्या पिढींनी मात्रा यात बदल घडवून आणला. हळूहळू नव्या लोकांनी बोधवादी दृष्टी नष्ट करून त्यात रोचकता, मनोरंजकता आणली.

स्त्रियांचे आत्मपर लेखन :

स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची संख्या खूपच कमी आहे. अर्थात त्यालाही कारणे आहेत म्हणा. हे जास्त विषद करून सांगण्याची गरज नाही. आत्मचरित्र लिहिण्या-यांची संख्या कमी असली तरी काही स्त्रियांची आत्मचरित्रे मराठी वाङ्मयात आपले स्थान टिकवून आहेत.

स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांत रमाबाई रानडे यांच्या "आमच्या आयुष्यातील काही आठवणी" या ग्रंथास मानाचे व पहिले स्थान दयावे लागेल. एक अव्वल दर्जाचे आत्मचरित्र म्हणून याची गणना मराठी आत्मचरित्र वाङ्मयात केली जाते. न्या. रानडे यांच्या निधनानंतर लिहिलेल्या या ग्रंथात रमाबाईंनी पतीच्या सहवासातील हकीकत सांगितली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत नामदार गोखले म्हणतात,-

"आपल्या वयाची सत्तावीस वर्षे ज्यांनी त्या विभूतीबरोबर त्यांची सहधर्मचारिणी या नात्याने "सावली" प्रमाणे घालविली, त्यांच्या अंगचे नैसर्गिक तेज शिक्षणाने व अतिथोर सहवासाने अनेक परींनी वृध्दिंगत झाले व ज्यांचे मन रावसाहेबांच्या भक्तीत कायमचे गढून राहिले आहे, त्यांनी आपल्या दिगंतकीर्ती पतीच्या स्वभावाचे व आयुष्यक्रमाचे काढलेले चित्र आपणास पहावयास मिळाल्याबद्दल महाराष्ट्रातील लोकांस अभिमान व समाधान वाटणे साहजिक आहे." पत्नीने पतीबद्दल अशा त-हेने लिहिलेला हा हिंदुस्थानांतील पहिलाच ग्रंथ आहे. असेही त्यांनी नमूद केले आहे."[२७]

दुसरे स्त्रियांचे आत्मचरित्र म्हणून ज्याला वाङ्मयात अव्वल दर्जाचे स्थान दयावे लागेल ते आत्मचरित्र म्हणजे लक्ष्मीबाई टिळकांचे "स्मृतिचित्रे" होय. त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणाने, मोकळेपणाने आपल्या जीवनाचा वृत्तांत कथन केला आहे. यात तत्कालीन समाजस्थितीचेही दर्शन घडते. "आधुनिक मराठी वाङ्मयात "स्मृतिचित्रे" ही आत्मचरित्रे म्हणून निरपवाद अजोड आहेत."[२८] असा डॉ.अ.ना. देशपांडे यांचा अभिप्राय आहे.

याच्याही अगोदर पार्वतीबाई आठवले यांनी "माझी कहाणी" १९२८हे आत्मचरित्र लिहिले आहे. यात त्यांनी अनाथ बालिकाश्रमाच्या प्रचारिका म्हणून केलेल्या कामाची माहिती कळते.

आनंदीबाई कर्वे यांच्या "माझे पुराण" १९४४ या आत्मचरित्रांत तत्कालीन विधवा स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण व स्त्री शिक्षणाचा इतिहास आलेला आहे. शिवाय ब्राह्मण कुटुंबातील चालीरीतीबद्दल माहिती सांगितली आहे.

डॉ. कमलाबाई देशपांडे यांनी लिहिलेल्या "स्मरणसाखळीत" १९४३ महर्षी कर्व्यांच्या स्त्री शिक्षण कार्याच्या प्रसारास आपण कसे वाहून घेतले हे सांगितले आहे. त्या म्हणतात.

"मुलींना अण्णा म्हणजे माय वाटे अण्णांच्या आश्रमाच्या अभावी आपली काय स्थिती झाली असती; ते विद्यार्थिनींना कळे. व सुकून गेलेले, निर्माल्य झालेले फूल पुन्हा टवटवीत व्हावे त्याप्रमाणे आयुष्य अण्णांच्या प्रेरणेने पुन्हा विकसित होत आहे. त्यांनी आपणास जीवदान दिले आहे; असे वाटे."[२९] यावरून त्याकाळी कर्व्यांच्या स्त्री शिक्षणाला [आश्रमाला] बरेच महत्व होते हे समजून येते.

कवी माधवराव पटवर्धन यांच्या पत्नी लीलाबाई पटवर्धन यांनी लिहिलेला "आमची अकरा वर्षे" १९४५ हे आत्मचरित्र अत्यंत सरस उतरलेले आहे.

१९५० पर्यंतच्या कालखंडात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात अन्नपूर्णाबाई रानडे यांचे "स्मृतितरंग" १९४७ व ग्वाल्हेरच्या इंदिराबाई भागवत यांचे "या सदाशिव" १९४८, गिरिजाबाई केळकरकृत "द्रौपदीची थाळी", राधाबाई आपटेकृत "उमटलेली पावले" या सगळ्या आत्मचरित्रात कौटुंबिक जीवनाचे चित्रण आढळते.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रात आनंदीबाई विजापुरे यांचे "अजुनी चालतेच वाट" हे उल्लेखनीय आहे. या आत्मचरित्राविषयी त्या म्हणतात, "मी जे लिहिले आहे ते विरंगुळ्यासाठी. जेव्हा माणसाच्या अंत:करणात दु:ख दाटून येते तेव्हा त्याला कुठेतरी वाट दिल्याशिवाय राहवत नाही."[३०]

आनंदीबाई शिर्के यांच्या "सांजवात" या आत्मचरित्रात पुढच्या पिढीसाठी काही तरी मार्गदर्शन करावे असा हेतू दिसतो. "आपल्या जीवनात घडलेल्या घटना मुलांना उलगडून सांगाव्या म्हणून माझ्या आयुष्यात जे जे घडले ते ते मी लिहून काढले."[३१] असे म्हटले आहे.

इंदिरा मायदेव यांचे "स्मृतितरंग" ही एक चांगली लक्षात राहण्यासारखी आत्मकथा आहे. यात त्यांनी स्त्री विषयक समस्यांबद्दल आपले काही विचार मांडले आहेत.

आत्मचरित्रे कुणीही लिहिलेली असोत प्रत्येकाचा लिहिण्यामागचा हेतू वेगवेगळा दिसून येतो. या निरनिराळ्या प्रवृत्तीतून

जन्मलेल्या आत्मचरित्रांनी आपले एक असे वेगळे स्थान निर्माण केले आहे. खरे पाहता प्रत्येकांनी आपापले आत्मचरित्र लिहून ठेवायला पाहिजे. पण तसे घडत नाही. आत्मचरित्र लिहिणाऱ्यांना आत्मसमाधान मिळते असे केळकर म्हणतात, ते खरे असावे. ते म्हणतात, "आयुष्या अखेरच्या स्मृतिरूपी चांदण्यात गतजीवनाचा जो काय स्थूल देखावा दिसेल तो पाहून समाधान पावण्याचा सर्वात सोपा व उत्तम मार्ग म्हणजे आत्मचरित्र लिहिणे हा होय."[३२] आत्म-समाधानापेक्षाही उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून आत्मचरित्र लिहिल्यास मागील काही थोर व्यक्तींची ओळख होण्यास मदत होते. असा हा मनुष्याचे अस्तित्व टिकवून ठेवणारा उपयुक्त वाङ्मय प्रकार आहे.

oo *÷*÷*÷*÷* oo

** संदर्भ सूची **

१] मराठी विश्वकोश खंड दुसरा : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई. प्रथम प्रकाशन १९७६, पृष्ठ-११.

२] माटे श्री.म. : आपापले हितगुज व्हीनस प्रकाशन, पुणे-२ [प्रस्तावना] पृष्ठ-२.

3) Naik, Dr. D.G. : Art of Autobiography, Vidarbha Marathwada Company, Poona First Published, 1962, Page-13.

४] जोशी अ.म. : चरित्र - आत्मचरित्र [तंत्र आणि इतिहास] सुविचार प्रकाशन मंडळ, प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर. पहिली आवृत्ती १९५६, पृष्ठ-१०३.

5) Encyclopaedia Britannica, Vol.2 : Encyclopaedia Britannica, Ltd., William Benton, Publisher, London 1963, Page-854.

६] ग्रामोपाध्ये, डॉ.गं.बा. : "आमचे समीक्षक", "ललित" एप्रिल १९८२, पृष्ठ-३८.

७] देशपांडे अ.ना. : आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली १९५८, पृष्ठ-५३.

८] परूळेकर गोदावरी : "माझे आत्मचरित्र आणि मी" "ललित" दिवाळी अंक नोव्हें.-डिसें. १९८१, पृष्ठ ५१.

९] मर्ढेकर बा.सी. : सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती १९७५, पृष्ठ-१४६.

१०] जोशी अनि : पृष्ठ-१०६.

११] प्रदक्षिणा : १८४० ते १९६५ मराठी वाङ्‌मयाचे चिकित्सक समीक्षण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. चौथी आवृत्ती, पृष्ठ-२८२.

१२] जोशी अनि : पृष्ठ-१०७.

१३] बेडेकर मालती : "माझे आत्मचरित्र आणि मी", "ललित" दिवाळी अंक नोव्हें-डिसें. १९८१, पृष्ठ-४८.

१४] जोशी अनि : पृष्ठ-१०७.

१५] तत्रैव, पृष्ठ-१०७.

१६] तत्रैव, पृष्ठ-१०८.

१७] गाडगीळ गंगाधर : साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई- १९६२, पृष्ठ-६८,६९.

१८] जोशी अ.म. : प्रदक्षिणा "चरित्र वाङ्मय" कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, पाचवी आवृत्ती १९७२,पृष्ठ-१९९.

१९] जोशी श्रुनि : पृष्ठ-१४१.

२०] तत्रैव, पृष्ठ-११५.

२१] म.गांधी : संक्षिप्त आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद-१४, पहिली आवृत्ती, प्रस्तावना, पृष्ठ-५,६,७.

२२] कुलकर्णी वा.ल. : वाङ्मयातील वादस्थळे, पॉप्युलर प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९६२, पृष्ठ-१४८.

२३] कुलकर्णी भीमराव : "नाना फडणिसांचे आत्मचरित्र" [प्रस्तावना] महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक २२१, एप्रिल-मे-जून १९८२, पृष्ठ-१.

२४] देशपांडे अ.ना. : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे-२, आवृत्ती पहिली १९५४,पृष्ठ-११४.

२५] देशपांडे अ.ना. : आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे-२, आवृत्ती पहिली, जानेवारी १९५८, पृष्ठ-५६२.

२६] तत्रैव, पृष्ठ-५६५.

२७] फडके, भालचंद्र : मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०, पहिली आवृत्ती १९८०, पृष्ठ-१४१.

२८] देशपांडे अनि : पृष्ठ-५५६

२९] देशपांडे डॉ. कमलाबाई : स्मरण साखळी, मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे. १९४३, पृष्ठ-५६.

३०] प्रदक्षिणा : अनिरुध्द अनंत कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, सहावी आवृत्ती, पृष्ठ-२९५.

३१] तत्रैव, पृष्ठ-२९६.

३२] जोशी अनि. : पृष्ठ-१४७.

00 *÷*÷*÷* 00